# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५५ वा ❑ शुक्रवार दि.०५ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# धर्मजागरण विभागाच्या कार्यालयाचे पुण्यात भूमिपूजन

## कार्यावरील विश्वासामुळेच संघाला भरभरून साहाय्य



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – समाजासाठी आणि देशासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते निःस्वार्थीपणे गेली शंभर वर्षे काम करत आहेत. या कार्यामुळेच संघाबद्दल समाजामध्ये विश्वास निर्माण झाला आहे. या विश्वासामुळे समाज संघाला भरभरून साहाय्य करत आहे, असे प्रतिपादन संघाच्या अखिल भारतीय धर्मजागरण गतिविधीचे समन्वयक शरदराव ढोले यांनी केले. धर्मजागरण गतिविधीचे अखिल भारतीय कार्यालय पुण्यात बांधले जाणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश उर्फ नाना जाधव, महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, पर्वती भागाचे संघचालक ॲड. चंद्रशेखर कुलकर्णी, ज्येष्ठ कार्यकर्ते दिवाकर पांडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मित्रमंडळ सोसायटीमध्ये अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठानतर्फे मुद्रिका बंगला येथे हा कार्यालय बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

धर्मजागरण विभागाचे काम देशभरात वाढत आहे. त्यामुळे कार्यालयांचीही गरज निर्माण झाली आहे. पुण्यात कार्यालयाची जी इमारत तयार होईल त्यात अध्ययन, संशोधन, संस्था सक्षमीकरण, कार्यकर्ता प्रबोधन, कार्यकर्ता प्रशिक्षण अशा अनेक योजना चालवल्या जातील. प्रशिक्षणाचे अनेक विषय या कार्यालयाच्या माध्यमातून सुरू केले जातील, अशी माहिती ढोले यांनी दिली.

संघ प्रेरणेतून चालणाऱ्या संस्थांना जो निधी किंवा ज्या वास्तू देणगीरूपाने दिल्या जातात, त्यांचा उपयोग योग्य त्याच कारणांसाठी होतो, हा विश्वास समाजात निर्माण झाला आहे. समाजाला बरोबर घेऊनच संघ यापुढेही काम करत राहील, असेही ढोले यांनी सांगितले. कै. वासुदेवराव आणि कै. कमलताई गोखले या दाम्पत्याच्या दातृत्वाबद्दलची माहिती ॲड. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी दिली. गोखले यांनी त्यांचा मित्रमंडळ सोसायटीतील बंगला अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठानला देणगी स्वरूपात दिल्यामुळेच त्या जागी नवी वास्तू साकारत आहे, असे कुलकर्णी म्हणाले. सेवा आणि समाजोपयोगी उपक्रम चालावेत या अपेक्षेने जी वास्तू देणगी स्वरूपात देण्यात आली आहे, त्याच अपेक्षेप्रमाणे या वास्तूचा उपयोग केला जाईल, असा विश्वास प्रा. नाना जाधव यांनी व्यक्त केला. नितीन कमळापूरकर, शिरिष किराड, हेमंत हरहरे यांनीही मनोगत व्यक्त केले. मिलींद वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.

# ‘चाणक्य ते मोदी व्हाया विवेकानंद’ ; अविनाश धर्माधिकारींच्या व्याख्यानाची तयारी जोरात

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – रा.स्व. संघाच्या अरण्येश्वर प्रभात शाखेच्या पुढाकाराने सहकारनगरमध्ये आयोजित केलेल्या ‘शिक्षण महर्षी लक्ष्मीकांत जांभोरकर स्मृती व्याख्यानमालेत’ माजी सनदी अधिकारी आणि विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांच्या रविवारी दि. ७ डिसेंबर रोजी होणा-या व्याख्यानाबाबत तरुणांमध्ये कमालीची उत्सुकता असल्याचे जाणवते. व्याख्यानमालेच्या कार्यकर्त्यांनी तरुणांवर लक्ष केंद्रित केले असून महाविद्यालये,वसतिगृहे, अभ्यासिका अशा अनेक ठिकाणी निमंत्रण पोहोचवले आहे. चाणक्य ते मोदी व्हाया विवेकानंद हा व्याख्यानाचा विषय असून त्याबाबत तरुणांमध्ये विशेष कुतुहल आहे.

व्याख्यानमालेच्या कार्यकर्त्यांची एक बैठक रविवारी प्रत्यक्ष व्याख्यान स्थळावर झाली.यावेळी सर्व व्यवस्थांचा आढावा घेण्यात आला.

हे व्याख्यान येत्या रविवारी दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सहकारनगर क्र.१ मधील विद्याविकास विद्यालयाच्या क्रीडा संकुलाच्या मैदानावर होईल.

व्याख्यान सर्वांसाठी खुले राहील.

# प्राकृतिक आणि प्रासादिक बुद्धिमत्तेचे वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारतीय संस्कृतीच्या अधिष्ठानस्थानावर वेदांचे अढळ स्थान आहे. ज्ञान, आचार, अध्यात्म आणि विज्ञान यांचा संगम असलेल्या या परंपरेचे जतन करणे आजच्या वेगवान तंत्रयुगात जितके आव्हानात्मक आहे, तितकेच महत्त्वाचेही आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील एक तरुण वेदसाधक ‘‘वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे‘‘ यांनी केवळ स्थानिकच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवरही लक्ष वेधून घेतले आहे. शुक्लयजुर्वेदाच्या माध्यंदिनी शाखेतील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या दंडक्रम पारायण हे त्यांनी अवघ्या १९ व्या वर्षी पूर्ण करून वेदपरंपरेला नव्या उंचीवर नेले आहे. त्यांच्या अभ्यासाची, साधनेची आणि समर्पणाची चर्चा आज देशभरात होत आहे आणि वेदविद्येला नवसंजीवनी देणारा हा युवा वैदिक सध्या सर्वांच्या प्रशंसेचा विषय ठरत आहे.



विद्यावाचस्पती
चन्द्रहास दुर्गादासशास्त्री सोनपेठकर

देवव्रत रेखे यांचे बालपण अतिशय साध्या, पण धर्मसंस्कारांनी संपृक्त अशा वातावरणात गेले. घरात संस्कृत-वेदांचा मान, शास्त्रोक्त विधींची आवड आणि पारंपरिक आचार यांमुळे त्यांच्यात लहानपणापासूनच वेदांविषयी ओढ निर्माण झाली. नित्यनियम, स्वाध्याय, मौन साधना, गुरुसेवा आणि शिस्त या सर्वांनी त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाची पायाभरणी केली. देवव्रत यांनी वेदसंस्कृतीचा कठीण आणि अत्यंत अनुशासित असा मार्ग स्वीकारला. ही निवडच त्यांच्या परिश्रमाची आणि जिद्दीची साक्ष देते. वेदमूर्ती श्री. महेश रेखे, कुटुंबीय, श्रीगुरुपरंपरा यांचे या दिव्य कार्यातील योगदान अद्वितीय असे आहे.

वेदांतील दंडक्रम हा पाठ क्रम अत्यंत गुंतागुंतीचा मानला जातो. मंत्रांच्या विविध पुनरावृत्त्या, स्वरांच्या अचूक हालचाली, उदात्त-अनुदात्त उच्चारांचे नियम आणि ५० दिवस अखंड साधनाही प्रक्रिया मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक अशा सर्वच पातळ्यांवर साधकाची परीक्षा घेणारी असते. या पारायणात सुमारे दोन हजार मंत्रांचे पुनःपुन्हा, विशिष्ट संरचनेत पठण करावे लागते. ही रचना भारतीय ध्वनीविज्ञान, स्मरणशक्ती आणि संहितापद्धतींचा एक विलक्षण नमुना आहे.

देवव्रत यांनी आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली या पारायणाची तयारी अत्यंत काटेकोरपणे केली. सकाळच्या प्रशांत वातावरणात सुरू होणारा वेदपाठ, दिवसभरातील अनेक तासांची साधना, स्वरसिद्धतेसाठी लागणारी पुनरावृत्ती आणि मन एकाग्र ठेवण्यासाठीची संयमी वृत्तीहे सर्व त्यांच्या दैनंदिन दिनचर्येचा भाग होते. आधुनिक जगात शारीरिक आणि मानसिक शिस्त राखणे हे कठीण झाले आहे; अशात वयाच्या १९ व्या वर्षी एवढ्या प्रगल्भतेने आणि समर्पणाने वेदसाधना करणारा युवक ही स्वतःतच एक अपूर्व बाब आहे.

**(क्रमशः)**

## विशेष लेख...

# मासिक पाळीचा पुरावा मागणे घृणास्पदच!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मासिक पाळी आली की नाही याबाबतचा पुरावा मागणे अत्यंत घृणास्पद व स्त्रियांच्या गोपनियतेचा भंग करणारा प्रकार आहे. हरियाणामधील महर्षी दयानंद विद्यापीठात काम करणाऱ्या चार महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना त्यांच्या मासिक पाळीचा पुरावा मागितल्याचा घृणास्पद प्रकार समोर आला आहे. सुप्रीम कोर्टाने या संदर्भात केंद्र सरकार, हरियाणा सरकार आणि इतर संबंधितांना नोटीस पाठवून उत्तर मागितले आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी सांगितले की, हा प्रकार समाजाच्या महिलांकडे पाहण्याच्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतो. त्या म्हणाल्या, ‘‘महिला पाळीमुळे कामावर येऊ शकल्या नाहीत, तर इतरांना काम देऊ शकत होते. काही राज्यांमध्ये तर मासिक पाळीसाठी सुट्टीही दिली जाते. मग त्या सुट्टीसाठीही पुरावा मागणार का?’’ सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष आणि वरिष्ठ वकील विकास सिंह यांनी हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे सांगितले. त्यांनी केंद्र आणि हरियाणा सरकारने उच्चस्तरीय तपास करावा अशी मागणी केली.

अत्यंत लज्जास्पद प्रकार म्हणजे रोहतक मध्ये चार महिला कर्मचारी यांच्या कपड्यांची तपासणी करण्यात आली. त्यांना पाळी सुरू आहे का हे पाहण्यासाठी कपडे काढायला लावले आणि त्यांच्या सॅनिटरी पॅडचे फोटो काढून पाहणी करण्यात आली. या घटनेनंतर संबंधित सुपरवायझरला निलंबित करण्यात आले. पोलिस ठाण्याचे यांनी सांगितले की, या प्रकरणात३१ ऑक्टोबरला दाखल करण्यात आला आहे. तीन आरोपींवर महिलांचा छळ, धमकी, मारहाण, आणि सन्मानाला धक्का देण्याचे आरोप आहेत. तसेच / अत्याचार प्रतिबंधक कायदाही लागू होऊ शकतो. विद्यापीठानेही स्वतःची चौकशी सुरू केली आहे आणि दोन सुपरवायझरला निलंबित केले आहे.

विशेष म्हणजे असा प्रकार या आधी देखील घडला. याचिकेमध्ये याआधी घडलेल्या घटनांचा उल्लेख आहे. उत्तर प्रदेश (,२०१७) : ७० मुलींना पाळी तपासण्यासाठी कपडे काढायला लावले होते. गुजरात (२०२०) आणि महाराष्ट्र (२०२५) :विद्यार्थिनींना अपमानित करत कपडे काढायला लावून पाळीचा पुरावा मागितला होता.

खरं तर मासिक पाळीबद्दल पुरावा मागणी करणे चुकीचे आहे कारण मासिक पाळी हा महिलांच्या आरोग्याचा एक सामान्य आणि नैसर्गिक भाग आहे आणि त्याचे व्यवस्थापन करणे हा मानवी हक्क आहे. याबद्दल चुकीचे समज आणि सामाजिक कलंक आहेत, ज्यामुळे अनेक महिलांना मासिक पाळी व्यवस्थापित करण्यात अडचणी येतात.

मासिक पाळी हा महिलांच्या आरोग्याचा एक नैसर्गिक आणि महत्त्वाचा भाग आहे, जो त्यांच्या गोपनीयतेचा विषय आहे. मासिक पाळीबद्दल मोकळेपणाने बोलता न येणे किंवा त्याबद्दल लज्जा वाटणे अनेक सामाजिक-सांस्कृतिक कारणांमुळे असू शकते, परंतु या विषयाला गोपनीयतेचा भाग न मानता सामान्य आरोग्य प्रक्रियेच्या रूपात पाहणे महत्त्वाचे आहे. यामुळे महिला आणि मुलींना आवश्यक आरोग्य सेवा आणि मदतीची उपलब्धता सुनिश्चित करता येते.

मासिक पाळी ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे आणि ती महिलांच्या आरोग्याचा एक सामान्य भाग आहे.अनेक ठिकाणी मासिक पाळीशी संबंधित कलंक, गैरसमज आणि निषिद्ध गोष्टींमुळे या विषयावर उघडपणे बोलले जात नाही, ज्यामुळे महिला आणि मुलींच्या आरोग्यावर परिणाम होतो.मासिक पाळीच्या आरोग्याची आणि स्वच्छतेची जाणीव आणि प्रचार महिलांचे आरोग्य आणि सन्मान राखण्यास मदत करतो. या प्रक्रियेची गोपनीयता राखणे आणि स्त्रियांच्या शारीरिक एकात्मतेचा आदर करणे महत्त्वाचे आहे, ज्याचा अर्थ त्यांच्या आरोग्याबद्दल योग्य आदर आणि गोपनीयतेची काळजी घेणे आवश्यक आहे.


## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख-१०८

*या लेखात आपण "तपकिरी" रंगाबद्दल माहिती घेऊयात."तपकिरी" हा रंग सर्वसमावेशक आहे. त्याला "समग्र" असेही म्हणतात. तीनही प्राथमिक रंग एकत्र करून "तपकिरी" तयार होतो. हा रंग नैसर्गिक आणि उबदार आहे. हा रंग लाकूड, माती आणि वाळूसारख्या नैसर्गिक घटकांशी संबंधित आहे. हा रंग "पूरक रंग" म्हणूनही ओळखला जातो कारण दोन रंग जे पूरक रंग आहेत जसे की, लाल व हिरवा किंवा पिवळा व जांभळा. एकत्र केले की "तपकिरी" बनतो.*

*या रंगाचा नैसर्गिक, मानसिक आणि भावनिक सहयोग होतो त्यामुळे या रंगाचे प्रभाव गतीने दिसून येतात. लवचिकता, विश्वासार्हता; सुरक्षितता यांच्या बाबतीत हा रंग अधिक परिणामकारक असतो. म्हणूनच "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये, तपकिरी हा रंग कुठल्याही प्रकारच्या रंग योजना आल्या तरी येतोच. हा रंग एकाकीपणाची भावना, दुःखावेग आणि नैराश्य घालवण्यासाठी खूप कार्य करतो:*

*"तपकिरी" रंग हा रंगांविषयक मानसशास्त्रात फार महत्वाचा मानला जातो. ताकद आणि विश्वासार्हतेची भावना या रंगामुळे दृढ होते, एकाकी पणावर मात करण्यासाठी मनोबल वाढवणारा हा रंग आहे. तपकिरी रंग हा सर्वात स्थीर रंगांपैकी एक आहे. परंतु तो विविध अर्थाचे प्रतीक म्हणून वापरला जाऊ शकतो. संदर्भ आणि सांस्कृतिक संबंधांनुसार त्याचा अर्थ बदलू शकतो.*

*तपकिरी रंगाच्या काही सामान्य प्रतीकात्मकते मध्ये, कंटाळा, साधेपणा मातीचा रंग, कौतुक, मंदपणा, उबदारपणा, लाजाळूपणा, संरक्षण, अंदाज लवण्याची कला, घृणास्पदपणा, प्रामाणिकपणा, मृत्यु क्षय, आराम, एकटेपणा, शून्यता, अलगीकरण, ज्ञान, असे गुण आणि मनोवेगाच्या भावना, संशोधनात आढळून आल्या आहेत.*

*तपकिरी रंग हा नक्षत्र आणि राशीच्या नुसार लाभदायक किंवा कमी फायद्याचा ठरु शकतो. कांही वेळेस निळ्या किंवा आकाशी रंगां सोबत तो प्रेम भावना वृद्धिंगत करू शकतो तर गडद काळ्या किंवा करड्या रंगा सोबत जर तपकिरी असेल तर निराशा, त्रासलेलं पण किंवा नाराजी तून आलेला एकाकीपणा यांचा प्रभाव जाणवतो*

*म्हणून रंगतज्ञाचा सल्ला देखील फारच महत्त्वाचा ठरतो.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

सासू सांगते सुनेला
नदी डोंगराची लेक
जाते मिळून समिंद्रा
नाही परतुन येत,, ||३७९||

माहेर,,माहेर,
नको जाऊ घडीघडी
दादला( पती) कवाड
बाई कवाडाची कडी ||३८०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# ट्युलिप्स आणि रानफुले- जीवनाची दोन प्रतीके




ज्योतिर्मय साहित्य

स्वतःचा शोध घेणारा माणूस म्हणजे रानफुलच आहे थोडा अनाकर्षक, थोडा वेगळा, पण खरा. तो माणूस जीवनाच्या प्रश्नांची उत्तरे झगमगाटात शोधत नाही तो प्रश्नांची मजा घेतो, जीवनाचा आनंद घेतो आणि पडलेल्या प्रश्नांची उत्तरं स्वतः निर्माण करतो.

असं समजू नका की ट्युलिप्सची बाग नकोच किंवा ती चुकीची आहे आणि रानफुलं श्रेष्ठ आहेत. दोन्ही मार्ग योग्य आहेत, दोन्हीही वेगवेगळे पर्याय आहेत फक्त त्यांच्या दिशा आणि अनुभव वेगळे ! दुसऱ्या शब्दात सांगायचं तर श्रेयस आणि प्रेयस मधला हा फरक आहे. प्रेयस गोष्टी आकर्षक असतात, सुख देणाऱ्या असतात परंतु अंतिम हिताच्या त्या असतीलच असे नाही तर श्रेयस गोष्टींचा मार्ग बऱ्याच वेळा खडतर असतो. परंतु अंतिम हित मात्र त्यातून नक्कीच जोपासले जाते. तो प्रगतीच्या उन्नतीचा आणि मुक्तीचा मार्ग असतो. आपण श्रेयस निवडायचे की प्रेयस याची अंतिम निवड आपलीच !



ट्युलिप्स आपल्याला दिलासा देतात. मन रिझवतात पण कधीतरी, जेव्हा आपण शांत एकटं बसतो, तेव्हा एक आवाज आतून हळूच ऐकू येतो

''ही सुंदर बाग आहे खरी, पण मी कोण आहे ? माझं अंतिम ध्येय हेच आहे का ?''

त्याच प्रश्नाच्या शोधात आपण त्या रानात शिरतो काट्यांतून, दगडांतून, आणि नकळत एक रानफुलं आपल्या आत उमलतं.

ट्युलिप्स आपल्या आयुष्याला सौंदर्य देतात, पण रानफुलं आपल्या आत्म्याला स्पर्श करतात.

आजच्या जगात, जेथे आपल्याकडे खूप काही भौतिक समृद्धी आहे, जिथे आपण हरवून गेलो आहोत तिथेच आपल्याला स्वतः चं अस्तित्व शोधण्याची आवश्यकता जास्त आहे. अशी खूप उदाहरणं आहेत की ज्यांनी फुललेल्या ट्युलिप्सच्या बागा सोडून रानफुलांची वाट निवडणं श्रेयस्कर ठरवलं . तुकाराम महाराजांना त्यांच्या पिढीचा सावकारीचा व्यवसाय चालवून मजेत आरामात राहणं सहज शक्य होतं परंतु त्यांनी ते नाकारून आत्मशोधाची वाट निवडली. भक्तिमार्ग निवडला आणि अंतिमतः लोकांचेही आपल्या उपदेशाने कल्याण केले. बाबा आमटे आपल्या वकिलीच्या व्यवसायात भरपूर पैसा कमवून आरामात जीवन घालवू शकते असते परंतु त्यांनी कुष्ठरोग्यांची सेवा करण्याचा खडतर मार्ग निवडला. तीच रानफुलांची वाट असते.

ज्यांना स्वतःला शोधायचं आहे, त्यांना ट्युलिप्स नव्हे रानफुलंच बोलावतात.


एक वाट नेहमीच सरळ आणि सुंदर असते. पण एक सुंदर इंग्रजी वाक्य आहे...

''ट्यूलिपला सहन न होणाऱ्या वादळांना तोंड देण्याची ताकद रानफुलांच्या शांत बहरात असते.''

दुसरी वाट असते वळणावळणाची, काट्यांनी भरलेली पण त्या वाटेवरचं गाणं आपलं असतं.

म्हणून या रंगीबेरंगी आयुष्यात एखादं क्षणभर थांबावं,
कुठल्याशा विचाराच्या रानात शिरावं,
आणि एखादं रानफुलं ओळखावं बहुधा ते आपणच असतो.

***



# दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सगुणभजन

ज्योतिर्मय साहित्य


२१ व्या ओवीत समर्थ म्हणतात की मी ज्या कुळात जन्माला आलो त्या कुळाचा कुलस्वामी श्रीराम आहे. तो माझं भरणपोषण करतो. ''आम्ही काय कुणाचे खातो आमचा राम आम्हाला देतो.''या ओळीवरून समर्थांच्या रामभक्तिची कल्पना येते. ''मी फक्त शहाणा ''अशा देहबुध्दीच्या माणसाचा विकास कधीच होत नाही.आपण तर परमार्थ साधत जीवन जगणारी माणसं आहोत.परमार्थ हा अतींद्रिय अनुभवाचा प्रांत आहे. आपल्याला परमार्थ समजत नाही तर आपण तो ज्ञानी पुरूषा कडून समजून घेतला पाहिजे. ज्ञानी लोक जे सांगतील त्या वर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांना विनाकारण दोष लावून नाना विकल्प मनात आणून आपली श्रध्दा भंग होउ देऊ नये. ''मला सर्व समजते'' ही भावना परमारर्थात अती घातक ठरते. अशा बुद्धीहीन माणसाचे होते काय तर धड ज्ञान नाही धड भक्ति नाही आहे तो केवळ असार होय.थोर पुरूषाच्या ज्ञानी पुरूषशाच्या मनातून उतरणे हीअगदीच दुर्दैवी घटना आहे. राजपदाचा हक्क असणारा एखादाच राजपुत्र आपल्या दुराचाराने तो हक्क गमावून बसतो आणि दुर्दैवी बनतो. मी मोठा आहे मी आत्मज्ञानी असल्याची खुण सतत मिरवत रहाणे हे आत्मज्ञान .नसून देहाभिज्ञान आहे. देहाभिज्ञानाची सुप्त कल्पना त्याच्या अतर्यामी सतत वास करत असते।

श्री रामरायाचे नाव घेऊन कोणतेही कार्य केले तर ते सत्वर होते हा समर्थाचा अनुभव आहे . आपणही समर्थाच्या विचारांने प्रेरणा घेतली आहे तर समर्थ विचार हे आपल्या साठी ब्रम्ह वाक्यचं आहे. जर जगातील सर्व घटना ईश्वर साक्षीने होतात तर कोणत्याही गोष्टीचे कर्तेपण आपल्याकडे घेऊ नये. ''कर्ता राम आहे''

या अनुसंधानाला निरंतर सांभाळावे. कोणत्याही कर्माचे कर्तेपण जो अगदी मनापासून भगवंताकडे सोपवतो त्याच्या जीवनात ईश्वरीसत्ता कल्पनेच्य बाहेरच्या गोष्टी घडवून आणते. कर्ता राम आहे मी कर्ता नाही त्याच्या विचारावर चालणे हे माझे आद्य कर्तव्य आहे आणि ते ईमानाने पार प डणे ह्यातचं सद्गुरूवचन दडलेले आहे यावर विश्वास ठेवला पाहिजे. यालाच ''सगुणनिवेदन''म्हणतात. तर निर्गुणामध्ये त्याच्याशी एकरूप होऊन साधक निर्गुण होऊन जातो. यावेळी समर्थ सगुणनिर्गुणाच्या उपासनेचा भेद समजाऊन सांगतात. देहबुध्दी सुटलेला पुरूष ज्ञानमार्गाचा अधिकारी असतो. अंतर्यामी निर्गुण आत्मस्वरूपाचे अनुसंधा राखतां राखतां तो स्वस्वरूपाशी समरस होऊन जातो. देहबुध्दीचा माणूस उपासनेचा अधिकारी असतो. ''ईश्वर कर्ता आहे''अशी खरी भावना ठेऊन सर्व कामे करीत गेल्याने त्याची वासना क्षीण होत जाते मन आपोआप अंतर्मुख आपण केवळ ईश्वराच्या हातातील बाहुले आहे हे सत्य पटल्यावर विश्वातील ईश्वरनिष्ठांची शक्ति त्याच्या कडून मोठे कार्य करवून घेते.म्हणून मी फक्त कर्ता आहे असे कधीही वागू नका. आता बघत हं मंडळी ''मी कर्ता''म्हणले तर सतत काळजी घ्यावी लागते. मन ऊद्विग्न होते विचार थांबतात.गती खुंटते. याऊलट ''ईश्वर कर्ता आहे''याभावनेमुळे अनंत ईश्वरशक्ति आपल्या पाठीशी ऊभ्या असल्याचे जाणवते. आपल्या कर्मात तेज येत रहाते एकदा का ईश्वराच्या शक्तिचा अनुभव घेतला की यश किर्ती अने भाग्यदायी घटना तुमच्या आयुष्यात घडतातं ईश्वराच्या आशिर्वादाने प्रत्यक्ष सगूणनिर्गुणाचे दर्शन होते.

***

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




ज्योतिर्मय साहित्य

काल माऊलींच्या चरणी नांदेडच्या एका भक्ताने एक कोटी रूपयांचा रत्नजडीत मुकूट अर्पण केला त्या माउलींना एके काळी दोन वेळचा घास मिळत नव्हता रहायला आसरा नव्हता. संन्यासाची लेकरे म्हणून सतत हेटाळणी सहन करावी लागली अशा

श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली, माऊलींच्या जीवनपटा विषयी

मित्रांनो आपल्या मृत्यूचा सोहळा साजरा करणारा हा देवांचा देव ज्ञानोबाचं करू शकतो. कारण आपण सर्व सामान्य माणसं माणसं मृत्युचं नाव जरी काढलं तर अंगावर काटा येतो.

माझ्या नंतर माझ्या घरादाराचं काय होईल?

माझी मुलंबाळं व्यवस्थित रहातील का?असे एक ना अनेक प्रश्न तुमच्या माझ्या सारख्या सर्व सामान्यांना पडतील?

पण विश्वाचे आर्त मनामध्ये ठसवणाऱ्या पसायदानाने लहानपणापासून हरिपाठ विठ्ठल भक्ति व विचारांच्या सानिध्यात लहानाचे मोठे झालेल्या माउलीला मृत्यूचें भय कसले ? म्हणून कसलेही भय न बाळगता एक तरी ओवी अनुभवावी. हा संदेश माऊली देतात.

कापुराची वाती उजळली ज्योति ।
ठायींच समाप्ति झाली जैशी ।

आपल्या कर्तृत्व, श्रेष्ठत्व,व दातृत्व भारतीय संस्कृती व साहित्य सर्वदूर पोहचवणारी माऊलींच्या कार्यकाळा विषयी या लेखात थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करते.

ज्ञानराज माऊली बद्दल थोडक्यात लिहिणे म्हणजे. मला माऊली काहीचं समजले नाही असे वाटते. कारण अशा थोर विभूती महात्म्यांचा अभ्यास एका जन्मात होणे शक्य नाही. तरी हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

पैठण जवळील आपेगावात गोदावरीच्या काठावर ज्ञानेश्वरांचे पूर्वज हरिहरपंत रहात होते. त्यांचा चार नंबरचा मुलगा त्र्यंबक त्यांनी संन्यास घेतला होता. त्र्यंबकपंतांच्या मुलांचे नाव गोविंदपंत. गोविंदपंतांचा विवाह देवकुळे कुलातील निराबाई या अत्यंत सात्विक, सोज्वळ कन्येशी झाला. त्याकाळच्या कालमाना प्रमाणे अत्यंत साधी रहाणी पण संपूर्ण कुटुंबाला आधार देणारी स्त्रि पतिनिष्ठा प्राणापलीकडे जपणारी भारतीय स्त्रियांचे मुर्तिमंत उदाहरण म्हणून निराबाई कडे पाहिले जाते.

खाण तशी माती या मातीचा सुगंध आज माऊलींच्या रूपाने आपण अनुभवत आहोत म्हणून

घराघरात ज्ञानेश्वर जन्माला यावेत. एकतरी ओवी अनुभवावी, पुढे त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले, त्यांचे नाव विठ्ठल ठेवण्यात आले.

विठ्ठलाचे मौजिबंधन झाल्यावर त्यांनी शास्त्राभ्यास सुरू केला. अतिशय विद्वान ब्राह्मण म्हणून पैठणच्या विद्वत सभेत विठ्ठल पंत सर्वमान्य होते.

आपण जन्म कुणाच्या पोटी घ्यावा हे आपल्या हातात नसते पण विठ्ठलपंत जन्माने व कर्माने पण ब्राह्मण होते. यच्चंयावत विद्वत्ता त्यांच्या नसानसांत होती.

अठरा पुराणे साही शास्त्र वेदविद्या त्यांना मुखोद्गत होती. आपल्या ज्ञानात भर पडावी म्हणून ते तिर्थाटन करत करत म्हणजे सोरटी सोमनाथ, काशी, गया मुचकुंद गुंफा धवलपूर करत करत ते त्र्यंबकेश्वर नाशिक येथे आले. पुढे भिमाशंरचे दर्शन घेऊन ते आळंदीला आले. विठ्ठलपंत इंद्रायणीच्या काठी आले खरे पण आपल्या नेमधर्मा नुसार दररोज स्नान संध्याकरत आळंदीत रहात होते. हा तेजःपुंज अतिथी हा तेजस्वी पुरुष आहे तरी कोण? चेहऱ्यावर असलेली विद्वत्ता व शुध्द पवित्र आचरण पाहून आळंदीचे रहिवासी असलेल्या श्री,सिध्देश्वर कुलकर्णी यांच्या नजरेतुन हा योगीपुरूष सुटला नाही.

(क्रमशः)




# दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातदुखीपासून लगेच आराम हवा असेल तर पेरूची पानं चावावीत अथवा पेरूची झाडाची पानं पाण्यात उकळून त्या पाण्याने चूळ भरावी. यामुळे तुमची दातदुखी तर बंद होतेच पण त्याचबरोबर हिरड्यांमधील सूज आणि त्रासदेखील बंद होतो.

तुमच्या दातामध्ये दुखत असल्यास, त्या ठिकाणी कच्च्या कांद्याचा तुकडा ठेवावा. त्यामुळे पटकन दातदुखी बंद होते.. आंबट पदार्थ खाल्ल्याने होणा-या कळा थांबतात. दात दुखणे कमी होते.

दातदुखीसाठी हिंगाचा वापर अतिशय फायदेशीर ठरतो. त्यासाठी तुम्ही एक ग्लास पाणी घ्या. त्यामध्ये दोन चिमूटभर हिंग आणि एक चिमूटभर सैंधव घालून उकळून घ्या. पाणी कोमट झाल्यानंतर या पाण्याने तुम्ही चूळ भरा. त्यामुळे लगेच दातदुखी बंद होईल.

दाताला कीड लागली असेल आणि त्यामुळे तुमचे दात दुखत असतील तर दोन चिमूट सैंधवमध्ये तिळाचं तेल घालून ही पेस्ट कीड लागलेल्या दाताला लावा. असं केल्यास, तुमच्या कीड लागलेल्या दातातील वेदना थांबतील.

दातदुखीसाठी लसूनदेखील एक चांगला उपाय आहे. लसणाची एक पाकळी दाताखाली दाबून ठेवावी. काही वेळातच दातामध्ये येणारे वेग कमी होतील.

प्रत्येकाच्या घरात बटाटे तर असतातच. तुमच्या दातांमध्ये दुखत असल्यास आणि सूज आली असल्यास, बटाटा कापून त्याचे स्लाईस करून त्या भागावर साधारण २० मिनिट्स ठेवा. लगेचच दुखणं बंद होईल.

दातदुखीपासून सुटका होण्यासाठी तुम्ही टी - बॅगचादेखील वापर करू शकता. गरम पाण्यात टी बॅग्ज ठेवा आणि तुमच्या दातदुखीच्या ठिकाणी शेका. यामुळे दुखणे कमी होईल.

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

(क्रमशः)

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



# लघु बोधकथा

♦ मोगली ♦

मोगली जंगलात फिरत होता. त्याला सर्व प्राणी आवडत होते. कारण तो जेव्हा लहान होता. तेव्हा वाघाच्या भीतीनं त्याची आई त्याला सोडून निघून गेली होती. तेव्हा प्राण्यांनी त्याला वाढवलं. आज आईनं त्याला ओळखलं व नेवू पाहिलं. म्हटलं, "हे माणसाचं पोर. माणसाजवळच हवं." त्यावर उत्तर देत मोगली म्हणाला, "मी जंगलातच राहणार. कारण जेव्हा माझ्यावर वेळ वेळ होती. तेव्हा आपण पळून गेले होते. प्राण्यांनी मला लहानाचं मोठं केलं. तेच माझे माय अन् बाप आहेत." मायबापानं ते ऐकलं व मायबाप निघून गेले.

बोध-

संकटात जो मदतीस येतो. त्यालाच माय आणि बाप मानावे.

# डॉ. संजीव शेंडे यांचा सन्मान; पं.जय पोहनकर यांच्या हस्ते गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** उपशास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात बहुमोल योगदानासाठी पुण्यातील सूर महती फाऊंडेशनच्या वतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या सूर महती महोत्सवात डॉ. संजीव शेंडे यांचा विशेष सन्मान करीत त्यांना गौरविण्यात आले. याबरोबरच मोठ्या प्रमाणात गोसेवा करणाऱ्यासाठी सुरभी सेवा परिवाराच्या अशोक पारीख यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. अजय पोहनकर यांच्या हस्ते डॉ. शेंडे आणि पारीख यांना गौरविण्यात आले. डॉ. हरी सहस्त्रबुद्धे, सूर महती फाऊंडेशनचे अतुल खांडेकर व भक्ती खांडेकर यावेळी उपस्थित होते.

पं. अजय पोहनकर यांनी डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे यांच्या आठवणींना उजाळा दिला. घराणं म्हणजे एखाद्या स्टॅम्प सारखं असतं त्यामुळे प्रत्येक कलाकाराने स्वत:ची शैली विकसित करायला हवी, असा सल्लाही पं. पोहनकर यांनी युवा कलाकारांना दिला.

डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे यांना आदरांजली म्हणून आयोजित करण्यात आलेल्या सूर महती महोत्सवात झालेला सन्मान माझ्यासाठी महत्त्वाचा असून डॉ. शेंडे यांनीही डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे आणि खांडेकर कुटुंबीय यांप्रती असलेला आदर व्यक्त केला. डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे यांच्या कडक तालीमीत माझी मुलगी सावनी शेंडे तयार झाली असेही ते यावेळी म्हणाले. डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे या विश्वविख्यात गायिका होत्या पण त्यांनी कायम मला लहान भावाप्रमाणे वागविले अशी आठवण देखील डॉ. शेंडे यांनी सांगितली.



अशोक पारीख यांनी सुरभी सेवा परिवाराच्या कार्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली.



# भावी आदर्श नागरिकाचे बिजे पुस्तकातच–अशोकजी नवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

**बालेवाडी, पुणे (डॉ.श्याम कुलकर्णी)–** श्रीभगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्य विकास यांच्या संयुक्त विद्यमाने बालेवाडी–बाणेर भागातील ८० सेवा वस्तीतील ३० शाळेत संस्कारक्षम पुस्तकाचे वाटप करण्यात आले होते.

बुकबँकेचे मुख्य संकल्पक व अश्रयदाते राजेंद्र तापडिया आहेत. पुस्तक वाटपाचा समारंभ गणपतराव बालवडकर यांच्या एस के पी शिक्षण संस्थेच्या सेमिनार सभागृहात संपन्न झाला. प्रमुख अतिथी श्रीनारायण चांडक, लहुआण्णा बालवडकर, मधुसुधन मालू व अशोक नवाल उपस्थित होते.

संस्कारक्षम नागरिक घडवयाचे असतील तर या प्रकारच्या पुस्तकांची गरज आज आहे! यातच संस्काराचे बियाणे सामावलेले असते. असे विचार अशोक नवाल यांनी प्रगट केले. समाजसेवक श्री लहुआण्णांनी वाचनालय ही काळाची गरज आहे असे विचार व्यक्त केले.  अमेरिकेतही भारतीय संस्कृतीक विचारांचा सुगंध दरवळत ठेवणारे श्रीनारायणजी चांडक यांनी मोबाईलच्या मुक्त वापराची चिंता व्यक्त केली व स्क्रिन टाईम कमी करण्यासाठी याप्रकारची शालेय बूकबँके ची गरज आहे!

या कार्यक्रमाचे संयोजक गिरीधर राठी, प्रकाशदादा बोकील, अरविंद वळसंगकर, व सुपर्णा सरदेसाई अनेक भगवती सेवा मंडळातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार डॉ.श्याम कुलकर्णी यांनी केले.

# साहित्यप्रेमी भगिनी मंडळाला आदर्श संयोजक पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी आत्ममग्नतेमुळे संस्थात्मक कार्याची हानी होत आहे असे मत व्यक्त केले. रंगत–संगत प्रतिष्ठानतर्फे साहित्यप्रेमी भगिनी मंडळाला आदर्श संयोजक पुरस्कार प्रदान करताना ते बोलत होते. हा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात पार पडला.




साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार साहित्यप्रेमी भगिनी मंडळाला देण्यात आला. मंडळाच्या अध्यक्ष अंजली कुलकर्णी यांनी प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या कार्यकारी विश्वस्त डॉ. मंदा खांडगे, रंगत–संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर आणि मैथिली आडकर उपस्थित होते.

प्रा. जोशी म्हणाले की, ज्या महाराष्ट्राला महात्मा गांधींनी कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हटले होते, तिथे आज कार्यकर्ते कुठे गेले असा प्रश्न पडतो. संस्थात्मक कार्यासाठी कार्यकर्त्यांचा पुरवठा मध्यमवर्गाने केला, परंतु आत्ममग्नतेमुळे हा वर्ग मी आणि माझे यापलीकडे विचार करत नाही. यामुळे संस्थात्मक कार्याची मोठी हानी होत आहे. संस्थांची संस्थाने झाली की चळवळ संपते, असेही त्यांनी नमूद केले.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचे कौतुक करताना प्रा. जोशी म्हणाले की, या मंडळाने ६१ वर्षे अव्याहतपणे काम करून संस्थात्मक कार्याचा आदर्श वस्तूपाठ उभा केला आहे. कोणत्याही पायाभूत सुविधा किंवा अनुदानाशिवाय पारंपरिक विद्यापीठांनी करायला हवे असे संशोधनाचे काम या मंडळाने केले आहे. त्यांच्या संशोधनात्मक प्रकल्पामुळे मराठी साहित्यातील संशोधनाचे दालन समृद्ध झाले आहे.

सरकारी यंत्रणांचा वापर करून संस्था ताब्यात घेणाऱ्या टोळ्यांचा सध्या सर्वत्र सुळसुळाट दिसून येत आहे, ज्यात साहित्यसंस्था त्यांच्या केंद्रस्थानी आहेत. साहित्यबाह्य शक्तींना रोखण्यासाठी संस्थेतील कार्यकर्त्यांनी खंबीरपणे भूमिका घेऊन लढा उभारला पाहिजे, असे आवाहन प्रा. जोशी यांनी केले. संस्थात्मक कार्य करताना समाज मानस समजून घेत वेध–प्रबोध शक्तीचा वापर होणे आवश्यक आहे.


यावेळी बोलताना अंजली कुलकर्णी यांनी सांगितले की, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ सातत्याने साहित्यिक उपक्रम राबवित आहे. गेली २८ वर्षे अविरतपणे सुरू असलेले संशोधनात्मक कार्य हा संस्थेचा मानबिंदू आहे. डॉ. मंदा खांडगे यांच्या प्रयत्नांमुळे आणि सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे स्त्री साहित्य मुख्य प्रवाहात आणले गेले, असेही त्यांनी नमूद केले.




# श्री पद्मनाभ स्वामी मंदिर तिरुव अनंत पुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

त्यांच्या नेत्रातून आनंदाश्रू वाहू लागले.अंगावर रोमांच दाटले. त्यांना बालक रुपातील भगवंतावर रागावल्या मुळे अपराधी पणाची तीव्र जाणीवही झाली. वारंवार ते भगवंताची क्षमा मागू लागले.



त्यांनी भगवंताला चिरंतन इथेच वास्तव्य करावे अशी विनंती ही केली. भगवंत म्हणाले मी सदैव इथेच वास करीन. इथे माझे मंदिर बांधले जाईल, व लोक ते अनंत पद्मनाभ म्हणून पुजतील. असे म्हणून प्रभू गुप्त झाले. दिवाकर मुनींनी ही घटना तेथिल राजाला सांगितली. तेथील राजाने त्या जागेवर एक मंदिर बांधले. तेच आजचे अति वैभवशाली श्री अनंत पद्मनाभ स्वामी मंदिर होय. मुनिंनी पाहिलेल्या दिव्य मूर्तीची स्मृती म्हणून मंदिरातील प्रमुख मूर्ती तीन दारातून आजही दर्शन देते.

*अनंत नागाची कथा*

शेष नागाचेच अनंत हे एक नाव आहे. त्याचा जन्म कश्यप ऋषी आणि कद्रू यांच्या १००० नागपुत्रां पैकी एक. परंतु सर्व नागांपेक्षा ते निर्दोष सात्वीक तपस्वी व अहिंसक होते.

कद्रु व विनता यांच्यातील वादामुळे विनताचा पुत्र गरुड हा सर्व नागांचा शत्रू झाला. पण शेषनाग मात्र कधीही कोणा चा द्वेष करीत नसत. बालपणापासूनच त्यांनी तप आणि योग मार्ग पकडला. शेषाने अनंत वनात येऊन प्रखर तप केले. त्यांना ब्रह्मदेव प्रसन्न झाले व वर माग म्हणाले. शेषनाग म्हणाले ‘‘देवा, मला अहंकार कधीही होऊ नये. मला राग येऊ नये. माझ्या हातून धर्म रक्षणाचे कार्य व्हावे. तशी शक्ती मला मिळावी. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मला भगवंताची नित्य सेवा करण्याची संधी मिळावी. ब्रह्मदेव तथास्तु म्हणाले. तू अनंत म्हणजे कधीही तुझा अंत होणार नाही असा होशील. तू सदैव विष्णूच्या समीप स्थान मिळवशील. हा वर त्यांनी दिला. याच स्थानावर शेषाने तपश्चर्या करून अनंत ही पदवी मिळवली होती. म्हणून या वनास अनंत वन हे नाव पडले.

शेषनाग आपल्या फणांवर संपूर्ण विश्व धारण करतात. जेव्हा विष्णू योग निद्रेत असतात तेव्हा शेष त्यांच्या शयनाचा आधार होतात. विश्व प्रलयाच्या वेळी, विष्णु शेषावर शयन करून विश्व पुन्हा निर्माण  होण्याची प्रतीक्षा करतात. भगवंतांनी जेव्हा राम अवतार घेतला तेव्हा शेष लक्ष्मण झाले व भगवंत जेव्हा कृष्ण जन्मात अवतीर्ण झाले तेव्हा शेष बल रामाच्या रूपात प्रकटले. **(क्रमश:)**

# कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. विलास भाले यांचा सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** भारतीय कृषी क्षेत्रात भरीव योगदान दिल्याबद्दल नवी दिल्ली येथे ‘‘ लाईफ टाईम अचिव्हमेंट ‘‘ पुरस्काराने गौरविण्यात आलेले पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विलास भाले यांचा पिंपळे सौदागरच्या साई पर्ल सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांच्यावतीने रविंद्र नंदनवार, अरविंद पाटील, निकेश कुमर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, श्रीफळ, शाल आणि पुणेरी पगडी देऊन सत्कार करण्यात आला. सोसायटीच्या क्लब हाऊस मध्ये बाजीराव



अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२ रोजी सायंकाळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अनिल कुलकर्णी, तानाजी कांबळे, सुखदेव फुलेवाले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत माने यांनी केले. चंद्रकांत पवार यांनी आभार मानले. सत्काराला उत्तर देताना डॉ. विलास भाले म्हणाले की, कुठलेही कार्य करताना स्वतः ला झोकून द्या, सकारात्मक रहा, यश हमखास मिळते.






# मराठी हिताची अभिवचने न देणाऱ्या पक्ष वा उमेदवारांना मत न देण्याचे आवाहन – डॉ श्रीपाद जोशी

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)** नियोजित अनुवाद अकादमी ही राज्याचा विभाग असू नये, साहित्य अकादमी प्रमाणे ती स्वायत्त संस्था राहील असे अभिवचन, राज्य मराठी विकास संस्थेला तिचे मूळ नियोजित कार्य पूर्तीसाठी भरघोस निधी दिला जाईल, त्यांची मूळ कामे त्यांना करू दिली जातील व या संस्थेला तिच्या मूळ कामाशिवाय अन्य उत्सवी, व्यासपीठीय गोष्टींसाठी वापरले जाणार नाही असे अभिवचन, शासनाच्या भाषा, साहित्य, संस्कृती विषयक संस्था, मंडळे इ. बरखास्त करून त्यांचे सरकारी खातेकरण करण्याचा जो  घाट सरकार घालत असते तो पूर्णपणे रद्द केला जाईल व त्यांना पूर्ण स्वायत्त दर्जा दिला जाईल हे अभिवचन, मराठीला अभिजात दर्जाचे सर्व लाभ अविलंब दिले जातील असे करण्यास केंद्र सरकारला बाध्य केले जाईल असे अभिवचन, मराठीसह भारतीय भाषांची आकाशवाणी, दिल्लीहून वर्षानुवर्षे प्रसारित होणारी जी राष्ट्रीय वार्तापत्रे तिथून बाहेर काढली गेली ती तिथूनच पूर्वीप्रमाणे प्रसारित केली जातील हे अभिवचन, या सर्व अभिवचनांचा पक्षांनी त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात समावेश करावा अशी विनंती त्यांना करण्यात आली आहे.

जे पक्ष वा उमेदवार मराठी हिताची अशी अभिवचनं देणार नाहीत त्यांना मराठी भाषिक समाजाने मत देऊ नये असे आवाहन देखील करण्यात आले आहे.






# श्री सद्गुरूंची अनुभूती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मित्र हो -

मी तुम्हाला थोड्या वेगळ्या क्षेत्रातला माझा अनुभव सांगणार आहे. हे आहे भक्ती-साधना आणि आध्यात्मिक विषयक क्षेत्र.

या क्षेत्रात मला जे गुरुजन भेटले त्यांच्या सहवासात माझी कशी जडणघडण झालीय, याची कहाणी म्हणजे माझ्यावर असलेली ''श्री सद्गुरूंची कृपा, श्री सद्गुरू-तत्व '' यांची अनुभूती-कहाणी आहे.

आष्टीच्या श्री दत्त मंदिरातील ६० वर्षांपूर्वी घडलेली अल्प-स्वल्प सेवा, त्यावेळी प.पु. रघुनाथ महाराज कालकुंद्रीकर या सद्गुरुंच्या सहवासाचा लाभ झाला.

इथून पुढे ही आयुष्याच्या वळणावर मला सद्गुरू रुपातल्या शेगावचे श्री गजानन महाराज, अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ, श्रीगोंदवलेकर महाराज आणि संतकवी दासगणु महाराज, स्वामी वरदानंद भारती, सद्गुरू श्री स्वतंत्रदेव जी महाराज, संत प्रवर विज्ञानदेव जी महाराज या गुरुजनांचे आशीर्वाद लाभलेले आहेत.

मित्र हो-

गुरूतत्वांची अशी नित्य अनुभूती माझ्या लेखन-प्रवासातील शिदोरी आहे.

माझी अशी भावना आहे की-श्री सद्गुरू आपल्या हातून सेवाकार्य करवून घेतात. ही भावनाच माझ्या या लेखनातुन व्यक्त करतो आहे. हे लेखन करतांना श्री सद्गुरूं वरील माझी श्रध्दा-भावना कृतज्ञा पूर्ण अंतः करणाची आहे.

मित्र हो-

माझी कन्या सौ.गौरी, जावईबापू श्री आनंद रमेश असोदेकर यांच्यामुळे अध्यात्मिक क्षेत्राचे एक नवे पर्व माझ्या आयुष्यात सुरू झाले आहे.

पारिवारिक नात्यासोबत सद्गुरू-भक्तीचे हे नवे पर्व सुरू होणे '' ही श्री सद्गुरूंची योजना आहे'' असे मला नेहमी वाटते.

या विहंगम-योग साधना-उपक्रमात आम्हाला सामील करून घेणारे श्री आनंद हे विहंगम योगाचे साधक, उपदेशक आणि प्रचारक आहेत.

त्यांच्यामुळे ''श्री सद्गुरूकृपेचा लाभ, दर्शनलाभ '' हे दिव्य अनुभव वाट्याला येत आहेत.

या अध्यात्मिक-ज्ञान, प्रवासास आरंभ झालाय तो २००८ साली. श्री.आनंद व सौ.गौरी यांच्या निवासस्थानी विहंगम योगाचे जेष्ठ साधक आले होते त्यांच्या मार्गदर्शनाने ''होम-हवन ''झाले. आम्ही सहभागी झालेला हा पहिला कार्यक्रम.

२०१२ मध्ये पुण्यात संत-प्रवर श्री विज्ञानदेव जी


महाराज यांचा सत्संग संपन्न झाला, या कार्यक्रमात ''विहंगम साधना'' म्हणजे काय हे पहिल्यांदा ऐकले.

२०१९ मध्ये विद्यमान सद्गुरू आचार्य श्री स्वतंत्रदेव जी महाराज यांचा कार्यक्रम पुण्यात झाला, त्यावेळी झालेल्या एक हजार कुंड -यज्ञाच्या होम-हवनमध्ये आम्ही उभयता सहभागी झालो, हा अनुभव खरोखर दिव्य होता.

श्री आनंद पुण्यात नित्य-नेमाने विहंगम योग -साप्ताहिक सत्संगाचे '' आयोजन करीत असून विहंगम योग साधनेचा प्रचार आणि प्रसारकार्य करतात.

२०२३ मध्ये विहंगम योग ''अर्थात ब्रह्मविद्या

प्रचार-प्रसार कार्याचे शताब्दी वर्ष साजरे झाले.



विहंगम योगाचे प्रणेता अमर हिमालय योगी''-

अनंत श्री सद्गुरु महर्षी सदाफलदेव जी महाराज यांनी १९२४ साली हे लोकोत्तर कार्य आरंभ केले.

या शताब्दी वर्षाच्या महोत्सवात

वाराणसी जवळील उमराह या ठिकाणी स्वर्वेद महामंदिर धाम येथे महायज्ञाचे आयोजन करण्यात आले.

या महायज्ञासाठी २५००० हजार यज्ञकुंड तयार केले गेले होते. एका यज्ञ-कुंडासाठी ४ जण, असे एक लक्ष साधक-भक्त पूर्व- नोंदणी करून सहभागी आले, आणि प्रत्यक्षात यापेक्षा अधिक यज्ञाकुंड करावे लागले कारण या आध्यत्मिक अनुभूती कार्यात असंख्य लोक सहभागी झाले आहेत असे दिसत होते.

याच वेळी स्वर्वेद महामंदिरचे ''लोकार्पण करण्यासाठीच्या सोहोळ्याला आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी, तसेच उत्तर प्रदेशचे



अरुण वि. देशपांडे, पुणे

मुख्यमंत्री श्री आदित्यनाथ योगीजी त्याच दिवशी उमराह येथे येणार हे कळाल्यामुळे यज्ञा-स्थळी आधीच्या लाख-दीड लाख संख्येत पुन्हा लाखाची भर पडली.

अफाट,दिव्य, असा लोकार्पण सोहोळा, पंतप्रधानांचे प्रभावी संबोधन -भाषण, योगी आदित्यनाथ यांचे प्रभावी मनोगत ''

हे प्रत्यक्ष पाहणे ''आमच्यासाहित सर्वांसाठी दिव्य-अनुभूती'' होती.

स्वर्वेद महामंदिर धाम ''हे आशिया खंडातील अतिविशाल साधना केंद्र आहे. या भव्य-ध्यान-साधना मंदिराची २००००(वीस हजार) साधक क्षमता आहे.

सद्गुरू आचार्य श्री स्वतंत्रदेवजी महाराज, संत प्रवर श्री विज्ञान देव जी महाराज यांच्या समवेत हे सर्व मान्यवर अतिथी व्यासपीठावर विराजमान होते.

त्या नंतर झालेला यज्ञ, होम हवन '' हा कार्यक्रम

श्री सद्गुरू कृपेने घडलेली सेवाच म्हणावी लागेल.

जुलै २०२५ या महिन्यात जावईबापू श्री.आनंद आणि कन्या सौ.गौरी यांच्यावर साक्षात स्वामीजींची कृपा झाली. आणि

अनेक वर्षांची शिष्याची आंतरिक इच्छा सद्गुरूंनी पूर्ण केली.

सद्गुरू आचार्य स्वतंत्रदेव जी महाराज, त्यांच्या निवडक शिष्य-मंडळींसह श्री.आनंद -सौ. गौरी यांच्या घरी आले. याप्रसंगी सौ.गौरीनेच पूज्य स्वामीजींसाठी स्वतः भोजन -पदार्थ बनवले.

स्वामींच्या दर्शनाची इच्छा आणि भेटीची, बोलण्याची ओढ देखील सद्गुरूंनी पूर्ण केली. माझ्या परिवारातील चिरंजीव अमित, सुनबाई. डॉ.ज्योती, नातू-अगस्त्य, पत्नी-सौ.मीनाक्षी आणि मी स्वतः, आम्हा सर्वांची स्वामींच्या दर्शनाची इच्छा, त्यांच्या भेटीची, बोलण्याची ओढ देखील सद्गुरूंनी पूर्ण केली. आम्ही मनोभावे दर्शन घेतले.

मी दर्शनास स्वामींसमोर उभा राहिलो तेंव्हा जावईबापू श्री.आनंद यांनी माझ्या अध्यात्मिक लेखनाबद्दल स्वामीजींना सांगितले.

तोच धागा पकडून स्वामींना नमन करीत मी म्हटले-

गुरुदेव - स्वामीजी -

विहंगम योगाबद्दल, आणि स्वर्वेद ग्रंथाबद्दल

नव्यापिढीला मराठीतून सांगणारे लेखन करण्यासाठी आपण मला अनुमती द्यावी व आशीर्वाद द्यावे,

त्यासाठी आज तुमच्याकडून मला स्वर्वेद -ग्रंथ, कृपा-प्रसाद म्हणून द्यावा .

आणि या लेखनास प्रेरणा-आशिर्वाद द्यावा अशी माझी प्रार्थना आहे.

माझी प्रार्थना-इच्छा आणि निवेदन ऐकून सद्गुरू -

स्वामीजी म्हणाले- यह तो अच्छी बात होगी ..!

स्वामीजी आनंदला म्हणाले -

स्वर्वेद की प्रती है तो लाईए.

मराठीत उपलब्ध असलेली स्वर्वेद ग्रंथ प्रत

आनंद यांनी तत्परतेने स्वामींना आणून दिली.

आणि सद्गुरूंनी त्यांच्या हस्ते

''स्वर्वेद ग्रंथ'' कृपाप्रसाद म्हणून माझ्या हातात दिला.

ग्रंथ घेतांना मी नमस्कार केला, त्यावेळी स्वामीजींनी ''माझ्या पाठीवर हात ठेवून मला आशीर्वाद दिला.''

साक्षात सद्गुरुंच्या परम-पावन स्पर्शाचा क्षण'' माझ्यासाठी भाग्यवान आणि रोमांचक क्षण होता''.

मित्र हो-

सद्गुरूंची कृपा मजवरी आहे '' याची अनुभूती पुन्हा एकदा नव्याने झाली.

स्वर्वेद- ग्रंथ वाचनास ''श्रावणमासआरंभ दिनी'' सुरूवात केले आहे.

''स्वर्वेद ''ग्रंथ म्हणजे विहंगम योगाचा प्रधान ग्रंथ आहे.

श्री सद्गुरू महर्षी सदाफलदेव जी यांनी चेतन योग समाधीच्या अवस्थेत प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष अनुभवांचे हे संकलन आहे.

सरल हिंदी भाषेतील दोह्यांच्या रूपाने हे दिव्य तत्वज्ञान वर्णन केले आहे.

जीवनात ''स्वर्वेदाचे आचरण मनुष्याला बनवते.

स्वर्वेद विहंगम योगाचा प्राण आहे, मुळतत्व आहे. स्वर्वेद हा विश्वातील अद्वितीय सद्ग्रंथ '' आहे.

स्वर्वेद'' या १०८४ पृष्ठांच्या सद्ग्रंथ वाचनानंतर लेखन उपक्रम करण्याचा माझा सेवा-मानस सद्गुरू पूर्ण करतील,

प्रेरणा देतील अशी माझी दृढ भावना आहे.

वरील सर्व लेखन उपक्रम ग्रंथ स्वरूपात श्री सद्गुरू चरणी अर्पण करण्याची ईच्छा श्री दत्त गुरू कृपेने सिद्ध होवो ही प्रार्थना .

हे सर्व आध्यत्मिक लेखन मी ''कवी अरुणदास या नावाने करीत आहे.

श्री सद्गुरू कृपा निरंतर अशीच राहो ही सदा प्रार्थना आहे.

।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।


।। जय दत्त गुरू-जय सद्गुरू ।।

।।दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।

---

# असाही एक चमत्कारिक अनुभव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



माझे वडिल कै.खंडेराव वसेकर(देशपांडे) यांची श्री दत्तात्रयावर प्रचंड भक्ती आणि विश्वास होता. ते परभणी येथील वसमत रोडवर गावाबाहेर असलेल्या दत्तधाम मंदिरात दरवर्षी दत्त जयंती निमित्ताने पारायणे करत असत. ते मंदिर खूप दूर असल्याने तेथेच भक्तांची राहण्याची व्यवस्था आहे. आता राहण्याची व्यवस्था खूप चांगली आहे पण त्या काळी थोडी साधारणच होती.

त्या दरम्यान, प्रचंड थंडीत सकाळी ४ वाजता बाबा थंड पाण्याने स्नान करून पारायणाला बसत असत.तेथे आसपास मोकळी हवा, झाडी आणि गार पाण्याने स्नान म्हणजे अतिशय कठिण असे, पण बाबांची तीव्र ईच्छा शक्तीमुळे ते शक्य होत असे. एकदा सहाव्या दिवशी त्यांना थंडी वाजून ताप आला होता. तो दिवस त्यांनी कसाबसा काढला. माझ्या आईच्या मनावर ताण स्पष्ट दिसत होता.मी साधारण ९ वी मध्ये असेल.



गिरीश खं. वसेकर, पुणे

मी आईला म्हणालो, बाबांना ताप आला आहे तर मग बाबा पारायण थांबवून घरी का येत नाहीत? तेंव्हा आई म्हणाली अरे बेटा, असे पारायण अर्धवट सोडून घरी जात नसतात. मग मी बाबांना म्हणालो, इकडे डॉक्टर असतील तर त्यांना बोलावू का? तर ते म्हणाले, अरे नको, होईल कमी ताप माझा. तू नको काळजी करू.

नंतर तेंव्हा तेथील महाराजांनी बाबांना गरम पाणी पिण्यास आणून देण्यास सांगितले. बाबांनी ते गरम पाणी पिले.

तोवर सकाळचे पारायण पार पडले होते. नंतर प्रसाद झाला आणि संध्याकाळी आरती,भजन सुरू झाले. त्या दिवशी संध्याकाळी दत्त अभंग, भजन खूप रंगात आले होते. ते म्हणताना बाबा खूप तल्लीन झाले होते आई आणि मी शेजारी बसलो होतो.

बाबांना या दरम्यान खूप घाम आला, त्यांनी तो जवळच्या उपरण्याने पुसला आणि म्हणाले, मला आता सकाळ पेक्षा खूप बरे वाटते आहे.तेथील तेथील ओक महाराज म्हणाले, आता घाम आला आहे, अर्थात ताप गेला निघून. हे ऐकून आईला आनंद झाला होता. आईने बाबांचा ताप हात लावून बघितला तर बऱ्या पैकी ताप उतरला होता. आम्ही सर्वांनी श्री दत्तात्रयाचे दर्शन घेतले आणि आई तेथे नतमस्तक होऊन म्हणाली, देवा अशीच तुझी कृपा आमच्यावर राहू दे.

उद्या सकाळी पारायणाचा शेवटचा दिवस आहे,यांना पूर्ण बरं वाटू दे. अचानक तेथे वाऱ्याचा झोत आला, आणि दत्त मूर्तीवर जवळ असलेले एक फुल आईच्या हातावर पडले. त्या मूर्ती पुढे आई पुन्हा नतमस्तक झाली. मी ते पाहतच राहिलो. आम्ही सकाळी त्या महाराजाच्या ही पाया पडलो. शेवटच्या दिवशी सकाळी जरी थंडी आणखी वाढली होती पण बाबांची प्रकृती एकदम ठीक झाली होती. बाबा सकाळीच लवकर उठून स्नान आटोपून पारायणाला तयार होऊन बसले होते. त्यांचा चेहरा प्रसन्न होता आणि ताप कुठल्या कुठे पळून गेला होता,आणि पारायण झाले तरी बाबा मात्र भक्तीत रंगले होते ते आणि म्हणत होते,

दत्ता दिगंबरा या हो
स्वामी मला भेट दया हो
दत्ता दिगंबरा या हो
सावळ्या मला भेट दया हो

---

# टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे येथे 'एआय इन लिटरेचर रिव्ह्यू' विषयावर व्याख्यान

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – एस. पी. मंडळींच्या टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे येथे संशोधन मंच अंतर्गत एक महत्त्वपूर्ण ऑनलाइन व्याख्यान ५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. दुपारी ३.३० वाजता होणारे हे व्याख्यान डॉ. मीनल ओक यांचे असून, त्या ''युज ऑफ एआय इन रिव्युइंग द लिटरेचर '' या अत्यंत समकालीन विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

संशोधन पद्धती, साहित्य समीक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता () यांचा परस्पर संबंध समजून घेताना हे व्याख्यान संशोधक, विद्यार्थी आणि शिक्षकवर्गासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या ऑनलाइन सत्रासाठी प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात आला असून सहभागी खालीलप्रमाणे मीटिंग आयडी व पासकोडद्वारे कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात:

मीटिंग आयडी : ७१७४३६९७०६
पासकोड : १२२१

या कार्यक्रमाचे इव्हेंट कोऑर्डिनेटर डॉ. सी. डी. सोनपेतखर, लेक्चर सिरीज कोऑर्डिनेटर प्रो. डॉ. एस. जी. इसावे असून, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. के. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

टिळक शिक्षण महाविद्यालयाच्या संशोधन मंचामार्फत आयोजित होणाऱ्या या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन क्षेत्रातील नवे प्रवाह आणि एआय साधनांचा उपयोग याबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे.

---


# श्री दत्तगुरू

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ब्रम्हा विष्णू आणि महेश्वर सामोरी बसले.. मला हे दत्तगुरू दिसले.. दत्तगुरूंचे नामस्मरण, दत्तगुरूंचे अनुष्ठान, आणि त्यांची आर्ततेने केलेली पूजा हेच जीवनाचे मोक्षदायी फल आहे.साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश ह्यांचा त्रिगुण अवतार म्हणजे श्री गुरुदेव दत्तात्रय अत्री ऋषी आणि अनुसयेच्या पोटी जन्माला आलेले योगी आत्मचिंतनाचा सुखद अनुभव, भक्तांसाठी कल्पतरू आहेत.

भय दुःख.दूर करून, मुळापासून जीवनातील मी पणाचे उच्चाटन करणारे सद्गुरू हेभक्तांचे जन्मोजन्मीचे पाप विमोचन करतात. अनुसयेचे पतिव्रत नारदमुनींनी देवतांना सांगितले तेव्हा इंद्र देवतेने अनुसयेच्या पतिव्रताची सत्वपरीक्षा घेण्यासाठी ब्रम्हा विष्णू महेश या तिन्ही देवांनी तिच्या आश्रमात अत्री ऋषी नसताना पाठवले.आपल्या घरी आलेल्या साधू महर्षींना भिक्षा भोजन त्यांची सेवा घडावी या हेतूने अनुसयेने तिन्ही देवतांना बाल्य स्वरूप देऊन त्यांचे. माते प्रमाणे पोट भरवले.. आणि हे तिघेही दत्तात्रय योगी अत्रीनंदन झाले. सहा हात, त्रिमुखी दत्त कालांतराने अनुसयेने तिन्ही रुप एकच करण्यासाठी देवांना विनंती केली. मार्गशीष महिन्यात दत्त जयंती उत्सव साजरा केला जातो.

दत्त वसले औंदुबरी
भोवताली श्वान गाई
कृपेचा भवसागर
ध्यानस्थ कृष्णा माई



दत्तगुरूंचे मुखकमल तेज सात्विक भाव, हातामध्ये शंख, सुदर्शन चक्र, कमंडलू आणि जपमाळ गळ्यामध्ये भुजंग आणि जटेमध्ये गंगा पाहता क्षणी मन एकाग्र होऊन जाते. योगीराज परब्रम्ह चैतन्य निर्माण करण्यासाठी युगानुयुगे अवतरत आहेत ते अनाधी अनंत काळचित्तवेधक वाटतात. जिथे जिथे दत्तगुरूचे प्रकट स्थान तिथे गारवा देणारा नदीचा संगम, औदुंबराची छाया, सभोवताली गाई आणि श्वानांना आसरा.. औदुंबर वृक्ष हा हिंदू धर्मात विशेष पवित्र आहे त्यामध्ये एकवीस गुणधर्म आहेत.. सदैव फळ असणारे हे झाड ह्याची प्रदक्षिणा नित्यनेमाने केल्यास अंगामध्ये सात्विक गुण विकसित होतात, संतती प्राप्ती साठी औदुंबरास प्रदक्षिणा घालणे असा पौराणिक उल्लेख केला जातो. अनेक नद्यांच्या संगमावर श्री दत्तात्रेय वेगवेगळ्या रूपांमध्ये वास्तव्य करून होते त्यामुळे तिथे केलेले स्नान पवित्र आहे.समोर असणारी गाय ही पृथ्वी व धर्माचे प्रतिक तर श्वान हे चार वेदांचे प्रतिक आहेत. पृथ्वीच्या ठिकाणची सहनशीलता, दया, गाईच्या ठिकाणी दिसून येते तर एकनिष्ठता श्वानांमध्ये आढळते. प्रपचांचे सारं आणि परमार्थ ह्यांना जोडणारे अध्यात्म श्री गुरुदेव दत्तात्रेयांच्या चरित्रामध्ये पदोपदी जाणवते.



प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर

श्री दत्तगुरूंचे सोळा अवतार मानले जातात त्यामध्ये प्रामुख्याने श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंह सरस्वती आणि तिसरा भौतिक अवतार स्वामी समर्थ मानले जातात. भक्तांचा उद्धार करण्यासाठी वेळोवेळी प्रकट स्वरुप प्राप्त होते गुरूचरित्र वाचताना अनेकदा आपणास प्रचिती येत राहते.

दत्तात्रय हे योगगुरू भक्तांचअज्ञान दूर करून अध्यात्मिक अनुभूती देणारे आहेत त्यांना स्मर्तुगामी म्हणजे स्मरण करताच धावून येणारे, इच्छापूर्ती करणारे असेही संबोधले जाते. भारतामध्ये अनेक दत्त मंदिरे आहेत. त्याची परिक्रमा पूर्ण करणे हा अनेक दतभक्तांचा ध्यास असतो.

देव भाव भक्तीने नक्कीच भेटतो अशी श्रद्धा गुरुदेवांच्या ठायीं ठेवली तर गुरुबळ वाढून जीवनाची दिशा योग्य वेळीच बदलून जाते. गुरूदेव दत्तात्रय हि नुकतीच आराधना नसून योगीराज प्रत्येक क्षणी आपल्या सहवासात राहून आपल्या कडून कार्य करून घेतात आणि त्याची आत्मिक अनूभुती वेगळ्याच समाधानात अंतर्धान पावते.

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

श्री स्वामी समर्थ महाराज की जय

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559